सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

ई-मेलव्दारे निर्गमित

ग्राम विकास विभाग
बांधकाम भवन, मर्झबान पथ,फोर्ट,
मंत्रालय, मुंबई.००१४००-

दूरध्वनी क्र .०२२-२२०१७१०६
Email ID :- sopr४.rdd-mh@nic.in

---

क्रमांक : व्हीपीएम-२०१६/ प्र.क्र.६०/पंरा-४

दिनांक:- ३ सप्टेंबर,२०२०.

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व.

विषय :- ग्रामपंचायत नमुना नं. ८ मध्ये सहकारी संस्थांकडील कर्ज प्रकरणा संदर्भातील बोजा नोंद करणेबाबत.

संदर्भ- क्र : व्हीपीएम-२०१६/ प्र.क्र.६०/पंरा-४, ६ डिसेंबर,२०१७.

महोदय,

उपरोक्त विषयांकित प्रकरणाच्या अनुषंगाणे संदर्भीय दि.६ डिसेंबर,२०१७ च्या शासन पत्रान्वये ग्रामपंचायत नमुना नं. ८ वर सहकारी संस्थांचे भार/कर्ज/बोजा नोंदविता येणार नाही, असे कळविण्यात आले होते.

तथापि,ग्रामीण भागात जिल्हा भूमी अभिलेख कार्यालयाकडून सर्व गावात प्रॉपर्टी कार्ड उपलब्ध नाहीत.यासाठी स्वामित्व योजनेद्वारे कार्यवाही सुरु आहे.त्यास अजून अवधी लागणार असल्याने गावातील लोकांना कर्ज घेण्यासाठी मोठी गैरसोय होत असल्याने ग्रामपंचायत नमुना नं.८ हा मालकी हक्क दर्शविणारे दस्त नसले तरी मालकाच्या नावाची नोंद ग्रामपंचायत नमुना नं. ८ वर असते.त्यामुळे दि.६ डिसेंबर,२०१७ रोजीचे शासन पत्र रद्द करून ग्रामपंचायत नमुना नं. ८ वर बोजा लावण्यास अनुमती देण्यात येत आहे.

आपला

(ल.स.माळी)
उपसचिव.महाराष्ट्र शासन